महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६/४८७ ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in , वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : पोस्टाने/ ईमेल द्वारे/ संकेतस्थळ

क्र. : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/३८३
दि. - ०८/ १२ /२०२०

प्रति,
सर्व संबंधीत संस्थांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
(मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था)
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- सन २०२०-२१ साठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या केंद्र शासनाच्या गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स) योजनेच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ - १) या कार्यालयाचे पत्र क्र : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/२०५ दि.०४/०९ /२०२०
२) या कार्यालयाचे पत्र क्र : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/३२४ दि. २९/०९ /२०२०
३) या कार्यालयाचे पत्र क्र : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/३५४ दि. ११/११ /२०२०
४) अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र : F.No.१५/१३/२०२०-SS-MoMA दि.०३/१२/२०२०

अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून सन २०२०-२१ साठीचे नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील ( NSP Portal संकेतस्थळ-www.scholarships.gov.in ) **केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती ( मेरीट-कम-मिन्स )** योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचनांनुसार उपरोक्त विषयांबाबत या कार्यालयाकडून संदर्भीय १ ते ३ च्या पत्राद्वारे सूचित करण्यात आलेले आहे. तरी उपरोक्त संदर्भ क्र. ४ च्या केंद्र शासनाच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार, सर्व संस्थांना खालीलप्रमाणे सूचित करण्यात येते की,

१. उपरोक्त नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील योजनेच्या कामकाजाकरिता नियमित ( Regular ) अधिकारी/कर्मचारी यांची Institute Nodal Officer ( INO ) म्हणून नेमणूक करण्यात यावी. ( सदर अधिकारी/कर्मचारी हे कंत्राटी स्वरुपाचे नसावेत.)
२. Institute Nodal Officer ( INO ) हा पोर्टलवरील योजनांच्या अंमलबजावणीसाठी व विद्यार्थ्यांच्या अर्जाच्या तपासणीसाठी ( प्रलंबित / मंजूर / नामंजूर ) जबाबदार असेल याची नोंद घ्यावी.
३. तसेच संस्थेच्या लॉगीन आयडी मध्ये प्राप्त होणारे विद्यार्थ्यांचे तपासणी करुन मंजूर केलेले अर्ज व उपरोक्त योजनेच्या लाभासाठी कागदपत्रे जसे विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्पन्नाचा दाखला ( Income Certificate ), गुणपत्रिका, जन्म दाखला ( Birth Certificate ), आधार कार्ड छायाप्रत, रहिवासी दाखला ( Domicile Certificate ) इत्यादी वर्षनिहाय, नवीन व नुतनीकरणनिहाय पुढील कमीत कमी ५ वर्षांकरीता जतन करावी आणि आवश्यकतेनुसार मागणी केल्यास Institute Nodal Officer यांनी उपलब्ध करुन द्यावे. Institute Nodal Officer ( INO ) यांनी संस्थेच्या प्राचार्यांचे पर्यवेक्षणांतर्गत योजनेचे सर्व कामकाज करावे. योजनेच्या प्रभावी व बिनचूक अंमलबजावणीसाठीची तसेच विद्यार्थी हा एकापेक्षा जास्त योजनांचा लाभार्थी

नसेल तसेच संस्थेकडून योजनेच्या लाभासाठी मंजूर केल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी कोणताही विद्यार्थी हा बनावट विद्यार्थी (Bogus / Fake applicant) नसेल याबाबतची खात्री संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: करावी.

४. Institute Nodal Officer ( INO ) यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्ड कोणाशीही सामायिक (share) करु नये व वेळोवेळी पासवर्ड ( Change the password with frequetly ) बदलावा.

५. विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर / नामंजूर करतेवेळी संस्थेच्या Institute Nodal Officer ( INO ) यांनी विद्यार्थी Day Scholar आहे की Hosteller याबाबत काळजीपूर्वक तपासणी करावी. कारण काही विद्यार्थ्यांचे अर्जामध्ये विद्यार्थी वसतिगृहामध्ये न राहाता देखील Hosteller असे Mark केलेले अर्ज मंजूर करुन पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे विद्यार्थी Hosteller असल्यास त्याचे नावाची भाडे भरल्याची पावती / भाडे करारपत्र या सहपत्राची छाननी न चुकता करावी.

६. संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी मध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज अंतिम मुदतीपर्यंत प्रलंबित न ठेवता त्वरीत छाननी करुन मंजूर / नामंजूर करावे. जर अंतिम मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहिले व कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,तंत्रशिक्षण चालनालय,मुंबई.

---

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/NSP/2020/ 2949
दिनांक :- 10 DEC 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर .

आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2020-21 साठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी असलेल्या केंद्र शासनाच्या गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स)योजनांतर्गत वरील पंत्रात नमुद केल्याप्रमाणे सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यांत यावी.

(डॉ. राम निबुदे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

**************